मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प
प्रकल्प समन्वयन व व्यवस्थापन कक्ष
शेती महामंडळ भवन, २७०,भाबुर्डा ,सेनापती बापट मार्ग ,पुणे -१६
संकेतस्थळ : www.smart-mh.org , दूरध्वनी ०२०-२५६५६५७७/२५६५६५७८

जा.क्र. स्मार्ट /पी.सी.एम.यु./प्र.अ.क./संपादन / ६३२/२०२३ दिनांक - ११/०९ /२० २३

प्रती,
प्रमुख प्रकल्प अंमलबजावणी कक्ष
कृषी,पशु संवर्धन,एमएसआरएलएम,माविम,व्हीएसटीएफ,एमसीडीसी
स्मार्ट प्रकल्प

विषय: स्मार्ट प्रकल्प अंतर्गत समुदाय आधारित संस्था स्तरावरील संपादन प्रक्रियेत करण्यात आलेले बदल व त्याची अंमलबजावणी करण्याबाबत

संदर्भ- १) स्मार्ट/पी.सी.एम.यु./सीबीओ/संपादन /१२७१ /२०२२ दि.२९ /०८ /२०२२ रोजीच्या मार्गदर्शक सूचना.
२ )स्मार्ट/पी.सी.एम.यु./प्र. अ. क. /संपादन /२०१ /२०२२-२३ दि.०७/०२/२०२३.
३) स्मार्ट/पी.सी.एम.यु./प्र. अ. क. /संपादन /६२६ /२०२३ दि. ११ /०४ /२०२३
४) स्मार्ट/पी.सी.एम.यु./प्र. अ. क. /संपादन /७७९ /२०२३ दि.०२ /०५ /२०२३
५) स्मार्ट/पी.सी.एम.यु./प्र. अ. क. /संपादन /९९६ /२०२३ दि.०५ /०६ /२०२३
६) स्मार्ट/पी.सी.एम.यु./प्र. अ. क. /संपादन /१११३ /२०२३ दि.२१ /०६ /२०२३
७) समुदाय आधारित संस्था संपादन मार्गदर्शक पुस्तिका जुलै २०२३
८ ) स्मार्ट/पी.सी.एम.यु./प्र.अ.क/संपादन/१४८६ /२०२३ दि. १७/०८/२०२३

मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट ) प्रकल्पांतर्गत समुदाय आधारित संस्थेच्या (CBO) मुल्यसाखळी विकासाचे उपप्रकल्प राबविताना विविध वस्तू, बांधकामे, सल्लागार सेवा इत्यादीचे संपादन प्रक्रिया वरील संदर्भीय मार्गदर्शक सूचनांनुसार करणे बंधनकारक आहे.

स्मार्ट प्रकल्प अंतर्गत समुदाय आधारित संस्था स्तरावरील संपादन प्रक्रिया राबववित असताना येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन संपादन प्रक्रिया जलद, सुलभ व पारदर्शक पद्धतीने करण्यासाठी यापूर्वी वरील संदर्भीय विविध परिपत्रके/सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. समुदाय आधारित संस्था संपादन मार्गदर्शक पुस्तिका जुलै २०२३ प्रसिद्ध करण्यात आली असून सदर पुस्तिकेत यापूर्वी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचा समावेश करण्यात आलेला नाहीत असे काही मुद्दे व नवीन करण्यात आलेले बदल या सर्वांचे एकत्रीकरण या परिपत्रकामध्ये करण्यात आलेला आहे. त्यामुळे समुदाय आधारित संस्था स्तरावर करण्यात येणाऱ्या सर्व संपादन प्रक्रियेबाबत या पूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या सर्व मार्गदर्शक सूचना अधिक्रमीत करून या पुढे समुदाय आधारित संस्था स्तरावर होणाऱ्या सर्व संपादन प्रक्रिया ह्या समुदाय आधारित संस्था संपादन मार्गदर्शक पुस्तिका जुलै २०२३ व या परिपत्रका नुसार करणे बंधनकारक आहे.

सदरच्या परिपत्रकानुसार करण्यात आलेल्या बदलाच्या अनुषंगाने E2, E5,W2,W5 या निविदा दस्तऐवजाच्या (Sep-23) मसुद्यात/प्रारूप नुसार बदल करून ते प्रकल्पाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे. तरी त्याबाबत संबंधित समुदाय आधारित संस्थाना व सर्व संबंधित अधिकारी यांना याबाबतची अंमलबजावणी तत्काळ करण्याबाबत बाबत आपल्या स्तरावरून सूचित करण्यात यावे.

प्रकल्प संचालक ,स्मार्ट

प्रत : सर्व जिल्हा व विभागीय अमलबजावणी कक्ष

## सुधारित समुदाय आधारित संस्था स्तरावरील संपादन प्रक्रियेबाबत मार्गदर्शक सूचना  सप्टेंबर २०२३

प्रकल्पांतर्गत या पूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या समुदाय आधारित संस्था (सी. बी. ओ.) करिता संपादन प्रक्रियेबाबत मार्गदर्शक सूचना, प्रकल्पाच्या संपादन पुस्तिकेच्या (PM) तसेच जागतिक बँके कडून वेळोवेळी घेण्यात आलेल्या मार्गदर्शन सूचना या सर्वांचे एकत्रीकरण सी. बी. ओ. संपादन मार्गदर्शक पुस्तिका -जुलै २०२३ मध्ये करण्यात आले आहे. सदर पुस्तिकेत यापूर्वी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचा समावेश करण्यात आलेला नाहीत  असे काही मुद्दे व नवीन करण्यात आलेले काही बदल यांचा समावेश या परिपत्रकामध्ये खालील प्रमाणे करण्यात आलेला आहे.

या परीपत्रकानुसार प्रकल्पांतर्गत सी.बी.ओ.स्तरावर करण्यात येणाऱ्या सर्व संपादन प्रक्रियेबाबत या पूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या सर्व मार्गदर्शक सूचना अधिक्रमीत करण्यात येत असून या पुढे सी.बी.ओ.स्तरावर होणाऱ्या सर्व संपादन प्रक्रिया संपादन मार्गदर्शक पुस्तिका -जुलै २०२३ व या परिपत्रकानुसार करण्यात यावी.

### १)  दरपत्रक / निविदा सादर करण्याचा कालावधी:

निविदा प्रसिद्ध झाल्यापासून दर पत्रक / निविदा सादर करण्यासाठी खालील प्रमाणे कमीत कमी कालावधी देण्यात यावा.

| अ.क्र. | बांधकामे/ वस्तु /यंत्र सामुग्री यांची खरेदीची अंदाजित रक्कम | निविदा सादर करण्याचा कालावधी |
|---|---|---|
| १ | रु.२०,००१/- ते रु. ३.०० लाखापर्यंत(एक लिफाफा पद्धत ) | १४ दिवस |
| २ | रु. ३,००,००१/- ते रु. ७० लाखापर्यंत(दोन लिफाफा पद्धत) | १४ दिवस |
| ३ | रु. ७०,००,००१/- व त्यापुढील(दोन लिफाफा पद्धत) | २० दिवस |
| ४ | फेर निविदा प्रक्रियेसाठी (कोणत्याही रकमेसाठी) | १४ दिवस |

टीप:

अ) वरील कालावधी हा कमीत कमी कालावधी असून सी. बी. ओ. आवश्यकतेनुसार या कालावधीत वाढ करू शकते. तथापि, कोणत्याही परिस्थितीत, सदरचा कालावधी कमी करता येणार नाही.

आ)  निविदा सादर करण्याचा अंतिम तारखेस शासकीय सुट्टी असल्यास; पुढील कार्यालयीन कामाच्या दिवसांची तारीख निविदा सूचना व निविदा दस्तऐवज मध्ये नमूद करण्यात यावी.

२) दरपत्रक / निविदा सूचना वर्तमानपत्रात प्रसिद्धी बाबत:

| अ.क्र. | संपादन बाब | खरेदीची अंदाजित रक्कम | वर्तमानपत्र |
|---|---|---|---|
| १ | **बांधकामे** | रु. ३,००,००१/- ते रु. ४० लाखापर्यंत | **जिल्हातील** जास्तीत जास्त खप असलेल्या एका मराठी दैनिक वृत्तपत्रामध्ये ( ज्यामध्ये शासकीय, निमशासकीय निविदा सूचना नियमित प्रसिद्ध होत असतात असे वृत्तपत्र) |
| २ | | रु. ४०,००,००१ ते रु. ७० लाखापर्यंत | एका **राज्य स्तरीय** मराठी दैनिक वृत्तपत्राच्या त्या विभागात प्रसिद्ध होत असलेल्या सर्व आवृत्तीमध्ये (ज्यामध्ये शासकीय, निमशासकीय निविदा सूचना नियमित प्रसिद्ध होत असतात असे वर्तमानपत्रे म्हणजेच सदरची निविदा सूचना प्रकल्पाच्या त्या विभागात येणाऱ्या सर्व जिल्ह्यांमध्ये प्रकाशित/प्रसिद्ध होणे आवश्यक आहे.) |
| ३ | | रु. ७०,००,००१/- पुढील | एका **राज्य स्तरीय** मराठी दैनिक वृत्तपत्राच्या महाराष्ट्रातील **सर्व आवृत्तीमध्ये** ( ज्यामध्ये शासकीय, निमशासकीय निविदा सूचना नियमित प्रसिद्ध होत असतात असे वर्तमानपत्रे म्हणजेच सदरची निविदा सूचना महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये प्रकाशित /प्रसिद्ध होणे आवश्यक आहे.) |
| ४ | **वस्तू / यंत्र सामुग्री / मशिनरी** | रु. ३,००,००१/- ते रु. ४० लाखापर्यंत | एका **राज्य स्तरीय** मराठी दैनिक वृत्तपत्राच्या त्या विभागात प्रसिद्ध होत असलेल्या सर्व आवृत्तीमध्ये (ज्यामध्ये शासकीय, निमशासकीय निविदा सूचना नियमित प्रसिद्ध होत असतात असे वर्तमानपत्रे म्हणजेच सदरची निविदा सूचना प्रकल्पाच्या त्या विभागात येणाऱ्या सर्व जिल्ह्यांमध्ये प्रकाशित/प्रसिद्ध होणे आवश्यक आहे.) |
| ५ | | रु. ४०,००,००१/- व त्यापुढील | एका **राज्य स्तरीय** मराठी दैनिक वृत्तपत्राच्या महाराष्ट्रातील **सर्व आवृत्तीमध्ये** ( ज्यामध्ये शासकीय, निमशासकीय निविदा सूचना नियमित प्रसिद्ध होत असतात असे वर्तमानपत्रे म्हणजेच सदरची निविदा सूचना महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये प्रकाशित /प्रसिद्ध होणे आवश्यक आहे.) |

३) प्रकल्पाच्या https://www.smart-mh.org संकेतस्थळावर प्रसिद्धी बाबत:

१. रु. २० हजार पुढील सर्व दरपत्रक विनंती पत्रे /निविदा दस्तऐवज प्रकल्पाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे.

२. दरपत्रक विनंती पत्रे ,निविदा दस्तऐवज हे वर्तमानपत्रात निविदा सूचना जाहिरात प्रसिद्ध होण्यापूर्वी आदल्या दिवशी किंवा त्याच दिवशी प्रकल्पाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धी करणे बंधनकारक आहे.

३. निविदापूर्व बैठकीचे आयोजन केले असल्यास त्या बैठकीमध्ये निविदा दस्तऐवजामध्ये जिल्हा अंमलबजावणी कक्षाच्या मान्यतेनंतर काही बदल करावयाचे असल्यास त्याबाबतचे शुद्धीपत्रक प्रकल्पाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धी करणे बंधनकारक आहे. परंतु असे बदल केल्यापासून निविदा सादर करण्यास निविदा धारकांना कमीत कमी ८ दिवसांचा कालावधी देणे आवश्यक आहे. त्या करिता गरजेनुसार निविदा सादर करण्याचा कालावधी वाढवून त्याबाबत शुद्धी पत्रकात नमूद करण्यात यावे.

४. निविदा सादर करण्यास मुदत वाढ देयची असल्यास त्याबाबतचे शुद्धीपत्रक त्याच दिवशी संकेतस्थळावर प्रसिद्धी होणे आवश्यक आहे.

४) संपादन प्रक्रियेच्या पूर्व मान्यतेबाबत:

अ) संपादन प्रक्रियेच्या पूर्व मान्यतेचे अधिकार :

संपादन प्रक्रियेच्या पूर्व मान्यतेच्या अधिकारात खालील प्रमाणे बदल करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | संपादन अंदाजित रक्कम | पूर्व मान्यतेचे अधिकार |
|---|---|---|
| १ | रु १० लाखाच्या पर्यंत | सी. बी. ओ. संपादन समिती |
| २ | रु १० लाखाच्या पुढे ते रु १५० लाखा पर्यंत | जिल्हा अंमलबजावणी कक्ष |
| ३ | रु. १५०  लाखाच्या पुढील सर्व | विभागीय अंमलबजावणी कक्ष |

आ) संपादन प्रक्रियेस पुर्व मान्यतेचे टप्पे

समुदाय आधारित संस्थेने रुपये १० लाखापेक्षा जास्त रकमेच्या संपादन बाबींसाठी खालील टप्प्यावर उपरोक्त तत्त्यानुसार स्मार्ट प्रकल्प कार्यालयाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक आहे.

१. दर पत्रक विनंती पत्रे / निविदा दस्तऐवज

२. तांत्रिक दस्तऐवज तपासणी अहवाल

५) निविदा / दरपत्रके सादर करणे, निविदा पूर्व बैठक आणि तांत्रिक व आर्थिक लिफाफे उघडण्याची प्रक्रिया संबंधित जिल्हा अंमलबजावणी कक्ष येथे करण्याबाबत:

१. स्मार्ट प्रकल्प अंतर्गत कृषि, पशुसंवर्धन ,एम.एस.आर.एल.एम., मविम, व्ही.एस.टी.एफ इत्यादी प्रकल्प अंमलबजावणी कक्षाच्या सर्व सी.बी.ओ.स्तरावरील रु. ३ लाखावरील संपादन प्रक्रियेतील सर्व निविदा सादर करण्याचे , निविदा पूर्व बैठकीचे तसेच तांत्रिक व आर्थिक लिफाफे उघडण्याचे ठिकाण हे त्या जिल्हातील जिल्हा अंमलबजावणी कक्ष हे राहील. निविदा सूचना तसेच निविदा दस्त ऐवजा मध्ये जिल्हा कार्यालयाचा संपूर्ण पत्ता, दूरध्वनी क्रमांक तसेच कार्यालयाचा ईमेल या बाबी नमूद करणे बंधनकारक आहे.

२. जिल्हा अंमलबजावणी कक्ष येथे प्राप्त होणाऱ्या सर्व निविदांची नोंद कार्यालयाच्या आवक रजिस्टर मध्ये करण्यात यावी. तांत्रिक लिफाफे उघडल्यानंतर सर्व निविदा धारकांनी सादर केलेल्या सर्व तांत्रिक दस्तऐवजाची एक प्रत संबंधित सी.बी.ओ. यांना देण्यात यावी व त्याची पोहोच घेण्यात यावी व त्याची मूळ प्रत जिल्हा अंमलबजावणी कक्षात संबंधित सी.बी.ओ. च्या नस्तीमध्ये लावून ठेवण्यात यावी.

३. निविदा प्रक्रियेत निविदाधारकांना सादर करावयाची निविदा शुल्क ही निविदाधारकांनी डिमांड ड्राफ्ट किंवा सी.बी.ओ.च्या बँक खात्यात ऑनलाईन किंवा ऑफलाईन जमा करावी . निविदा सादर करताना निविदा शुल्क भरल्याचा डिमांड ड्राफ्ट किंवा बँक खात्यात ऑनलाईन किंवा ऑफलाईन जमा केल्याची बँक पेमेंट रिसीट तांत्रिक लिफाफ्यात मध्ये सादर करण्यात यावी.

**६) संपादन प्रक्रियेच्या तांत्रिक लिफाफे उघडणे व तांत्रिक दस्तऐवज तपासणी अहवाल तयार करणे:**

१. सर्व निविदाधारकांचे विहित मुदतीत जिल्हा अंमलबजावणी कक्षास प्राप्त झालेले सीलबंद निविदा उघडताना (संपादन मार्गदर्शक पुस्तिकामध्ये जुलै २०२३ मध्ये नमूद केल्यानुसार) संबंधित सी.बी.ओ.च्या संपादन समिती मधील किमान ४ सदस्य तसेच जिल्हा अंमलबजावणी कक्षातील पुरवठा व मूल्य साखळी तज्ञ यांची उपस्थिति बंधनकारक आहे. अपवादात्मक परिस्थितीत पुरवठा व मूल्य साखळी तज्ञ त्यादिवशी रजेवर असल्यास अशा वेळी नोडल अधिकारी यांनी निविदा उघडण्यासाठी एका अधिकारी यांना नामनिर्देश करावे.

२. निविदा उघडल्यानंतर त्यातील सर्व सीलबंद आर्थिक लिफाफे न उघडता ते सर्व आर्थिक लिफाफे एका स्वतंत्र लिफाफ्यात सीलबंद करून त्यावर उपस्थितांच्या स्वाक्षरी घेण्यात याव्यात व तो सीलबंद लिफाफा जिल्हा अंमलबजावणी कक्षाच्या नोडल अधिकारी यांचे आखत्यारीत सुरक्षित ठेवण्यात यावा. प्राप्त निविदा सुरक्षित ठेवणे, निविदा विहित मुदतीत उघडणे, सीलबंद आर्थिक लिफाफा सुरक्षित ठेवणे तसेच निविदा उघडताना सर्व प्रक्रियेचे मोबाईल चित्रीकरण व फोटो घेऊन त्याचे रेकॉर्ड करून त्याचे MIS मध्ये नोंदणी करून जतन करून ठेवण्यात यावे. या सर्व प्रक्रियेचे पर्यवेक्षण व सनियंत्रण जिल्हा अंमलबजावणी कक्षाच्या नोडल अधिकारी यांनी करावे.

३. निविदामधील तांत्रिक लिफाफे उघडल्यानंतर प्राप्त तांत्रिक दस्तऐवजांची तपासणी सी.बी.ओ. संपादन समितीने त्याच दिवशी जिल्हा अंमलबजावणी कक्षातच समितीची बैठक घेऊन करण्यात यावी व त्याचा तांत्रिक तपासणी अहवाल त्याच दिवशी पूर्वमान्यतेसाठी जिल्हा अंमलबजावणी कक्षास सादर करण्यात यावा. अपवादात्मक

परिस्थितीत जर पुरवठा व मूल्य साखळी तज्ञ त्या दिवशी रजेवर असल्यास अशा वेळी तांत्रिक दस्तऐवज तपासणी न करता पुरवठा व मूल्य साखळी तज्ञ ज्या दिवशी उपस्थित असेल त्यादिवशी जिल्हा अंमलबजावणी कक्ष येथे संपादन समितीची बैठक घेऊन प्राप्त तांत्रिक दस्तऐवजांचा तांत्रिक तपासणी अहवाल तयार करून त्याच दिवशी पूर्वमान्यतेसाठी जिल्हा अंमलबजावणी कक्षास सादर करण्यात यावा.

४. तांत्रिक दस्तऐवजाची तपासणी करीत असताना जर काही निविदाधारकांचे तांत्रिक दस्त ऐवज अपूर्ण असल्यास अशी अपुरी दस्तऐवज(जे निविदा सादर करताना अस्तित्वात होते असे historical documents ) संबंधित निविदाधारकांना कमीतकमी ३ दिवसांचा कालावधी देऊन अपूर्ण दस्तऐवजे लेखी मागविण्यात यावीत किंवा निविदाधारकांनी सादर करण्यात आलेल्या दस्तऐवजाबाबत काही शंका /अस्पष्टता असल्यास अशा वेळेस संबंधित निविदाधारकाकडून कमीत कमी ३ दिवसाचा कालावधी देऊन स्पष्टता किंवा संबंधित दस्तऐवज लेखी मागविण्यात यावेत. संबंधित निविदाधारकांनी विहित मुदतीत सादर करण्यात आलेली दस्तऐवजाची पुन्हा तपासणी करून तांत्रिक दस्तऐवज तपासणी अहवाल अंतिम करण्यासाठी संपादन समितीची बैठक जिल्हा अंमलबजावणी कक्षात घेऊन अंतिम तांत्रिक दस्तऐवज तपासणी अहवाल अंतिम करून तो मान्यतेसाठी जिल्हा अंमलबजावणी कक्षास सादर करण्यात यावा.

**७) संपादन प्रक्रियेच्या आर्थिक लिफाफे उघडणे व त्याचे मूल्यमापन करून अहवाल तयार करणे:**

१. तांत्रिक तपासणी अहवालास संबंधित कक्षाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर संबंधित सी.बी.ओ. ने सर्व पात्र निविदाधारकांना त्यांचे आर्थिक लिफाफे उघडण्याची तारीख ,वेळ व ठिकाण कमीत कमी दोन दिवस अगोदर लेखी ईमेल द्वारे तसेच दूरध्वनि द्वारे कळविण्यात यावे. तसेच अपात्र निविदाधारकाची निविदा का नाकारण्यात आली आहे याबाबत संबंधित निविदाधारकास लेखी ईमेल द्वारे कळविण्यात यावे. असे करीत असताना ईमेल ची एक प्रत जिल्हा अंमलबजावणी कक्षास देण्यात यावी.

२. सर्व पात्र निविदाधारकांचे आर्थिक लिफाफे हे सी.बी.ओ.च्या संपादन समिती समोर विहित पद्धतीने (संपादन मार्गदर्शक पुस्तिकामध्ये जुलै २०२३ मध्ये नमूद केल्यानुसार) जिल्हा अंमलबजावणी कक्षामध्ये उघडण्यात यावेत. त्याकरिता संबंधित सी.बी.ओ.च्या संपादन समिती मधील किमान ४ सदस्य आर्थिक लिफाफे उघडताना उपस्थित असणे अनिवार्य आहे. तसेच संबंधित जिल्हा अंमलबजावणी कक्षातील पुरवठा व मूल्य साखळी तज्ञ यांची उपस्थिती अनिवार्य आहे. पुरवठा व मूल्य साखळी तज्ञ जर त्यादिवशी रजेवर असल्यास अशा वेळी संबंधित नोडल अधिकारी यांनी एक अधिकारी नामनिर्देश करण्यात यावा. आर्थिक लिफाफे उघडतानाचे मोबाइल चित्रीकरण /फोटो घेऊन त्याचे रेकॉर्ड करून त्याचे MIS मध्ये नोंदणी करून जतन करून ठेवण्यात यावे. या सर्व प्रक्रियेचे पर्यवेक्षण व सनियंत्रण नोडल अधिकारी यांनी करावे.

३. बांधकामाच्या निविदांबाबत पात्र ठेकेदारांचे आर्थिक लिफाफे उघडल्या नंतर प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता / आर्थिक मुल्यांकन अहवाल तयार करून समुदाय आधारित संस्थेच्या संपादन समितीने आवश्यकता असल्यास सर्वात न्यूयतम दर सादर करणाऱ्या ठेकेदाराशी त्याने सादर केलेल्या दराबाबत वाटाघाटी करून अंतिम दरास त्याच्या सी. बी. ओ. संचालक मंडळाची मान्यता घेऊन प्रकल्पाने निश्चित केलेल्या Letter of Acceptance

प्रारूपात योग्य ती माहिती भरून Letter of Acceptance निर्गमित करण्यात यावा व त्यानंतर निवड झालेल्या ठेकेदाराशी करार करण्यात यावा.

४. वस्तू,यंत्र सामुग्री निविदांबाबत पात्र ठेकेदारांचे आर्थिक लिफाफे उघडल्या नंतर प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता /आर्थिक मुल्यांकन अहवाल तयार करून समुदाय आधारित संस्थेच्या संपादन समितीने सर्वात कमी प्राप्त दर हा वाजवी आहे किंवा नाही याची खात्री ऑनलाईन उपलब्ध असलेल्या पोर्टलवरून करून घेण्यात यावी व त्याची प्रत जपून प्रिंट काढून जतन करावी व त्यानुसार आवश्यकता असल्यास सर्वात न्यूनतम दर सादर करणाऱ्या पुरवठादाराशी त्याने सादर केलेल्या दराबाबत वाटाघाटी करून अंतिम दरास त्याच्या संचालक मंडळाची मान्यता घेऊन प्रकल्पाने निश्चित केलेल्या Letter of Acceptance प्रारूपात योग्य ती माहिती भरून Letter of Acceptance निर्गमित करण्यात यावा व त्यानंतर निवड झालेल्या पुरवठादाराशी करार करण्यात यावा.

**८) सी. बी. ओ. स्तरावरील संपादन प्रक्रियेच्या प्रस्तावांची तपासणी व मान्यता देण्यासाठी जिल्हा व विभाग अंमलबजावणी कक्ष स्तरावरील संपादन समिती:**

| अ. क्र | अंमलबजावणी कक्ष | स्वीकृती प्राधिकारी | समिती सदस्य |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा अमलबजावणी कक्ष | प्रकल्प संचालक, आत्मा | १) जिल्हा नोडल अधिकारी (स्मार्ट) – अध्यक्ष<br>२) अर्थशात्रज्ञ तथा वित्त प्रवेश सल्लागार –सदस्य सचिव<br>३) सहायक अभियंता –सदस्य<br>४) विभागीय संपादन अधिकारी - सदस्य<br>५) कृषी व्यतिरिक्त इतर प्र.अ.क.(MAVIM, MSRLM, AHD, VSTF इतर) यांच्या सी.बी.ओ.करीता संबंधित प्रकल्प अंमलबजावणी कक्षाच्या नोडल अधिकारी यांनी नामनिर्देशित केलेला एक प्रतिनिधी - सदस्य (सदरचा सदस्य बैठकीस उपस्थित राहिला नसल्यास उर्वरित समितीने बैठक घेऊन निर्णय घेण्यात यावा) |
| २ | विभागीय अमलबजावणी कक्ष | विभागीय कृषि सहसंचालक | १) विभागीय नोडल अधिकारी (स्मार्ट)- अध्यक्ष<br>२) विभागीय संपादन अधिकारी – सदस्य सचिव<br>३) विभागीय पुरवठा साखळी व मूल्य साखळी तज्ञ -सदस्य<br>४) अर्थशात्रज्ञ तथा वित्तीय सल्लागार - सदस्य<br>५) सहायक अभियंता - सदस्य |

९) निविदाधारकांची किमान पात्रता अटी / निकष:

बांधकामे, वस्तू,यंत्रसामुग्री ,विना सल्ला सेवा करिता खालील प्रमाणे निविदा धारकांच्या किमान पात्रता अटी ठेवण्यात याव्यात व त्यानुसार नमुना दरपत्रक विनंती पत्र / निविदा दस्तऐवज मध्ये योग्य ते बदल करून निविदा प्रक्रिया करण्यात यावी.

**१) बांधकामासाठी:**

१. केंद्र किंवा राज्य PWD किंवा कोणत्याही सरकारी विभागाद्वारे जारी केलेल्या योग्य वर्गानुसार बांधकामे करण्यासाठी वैध परवाना असणे आवश्यक आहे.

२. विद्युतीकरणाचे काम असल्यास इमारतीच्या विद्युतीकरणाची कामे करण्यासाठी वैध विद्युत परवाना असणे आवश्यक आहे (सदरचे कामे दुसऱ्या कंत्राटदार यांच्या कडून करून घेणार असल्यास अशा कंत्राटदाराचे वैध विद्युत परवाना सादर करणे आवश्यक आहे)

३. मागील पाच आर्थिक वर्षामध्ये किमान एका वर्षाची आर्थिक उलाढाल अंदाजित खर्चाच्या ७५% असणे आवश्यक आहे.

४. निविदा मागविण्यात आलेल्या महिन्याच्या अगोदरच्या महिन्याच्या शेवटच्या दिवशी संपलेल्या **मागील ५ वर्षात समान कामे यशस्वीरीत्या** पूर्ण केल्याचा खालील पैकी कोणताही **एक** अनुभव आवश्यक आहे.

अ) **तीन समान** पूर्ण झालेल्या कामांची किंमत प्रत्येकी रु *[अंदाजित खर्चाच्या ४०%]* पेक्षा कमी नसली पाहिजे. **किंवा**

आ) **दोन समान** पूर्ण झालेल्या कामांची किंमत प्रत्येकी रु *[अंदाजित खर्चाच्या ५०%]* पेक्षा कमी नसली पाहिजे. **किंवा**

इ) **एक समान** पूर्ण झालेल्या कामांची किंमत रु *[अंदाजित खर्चाच्या ८०%]* पेक्षा कमी नसली पाहिजे.

५. कोणत्याही सरकारी संस्था, जागतिक बँक समूह किंवा कोणत्याही बाह्य निधी एजन्सीद्वारे निविदा सादर करण्याच्या तारखेला काळ्या यादीत, प्रतिबंधित किंवा निलंबित केलेले नसावे.

६. वस्तू आणि सेवा कर अंतर्गत नोंदणीकृत असावा.

७. तरल मालमत्ता आणि/किंवा क्रेडिट सुविधांची अंदाजित निविदा रकमेच्या किमान २५% उपलब्धता असावी त्याबाबतचे कोणत्याही वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थेचे पत्र किंवा Solvency certificate असणे आवश्यक आहे.

**२) वस्तू, यंत्र सामुग्री इत्यादी करिता :**

**अ) जर निविदाधारक हा उत्पादक असल्यास :**

१) निविदाधारकास मागील तीन आर्थिक वर्षातील किमान एका वर्षाची आर्थिक उलाढाल अंदाजित खर्चाच्या / किमतीच्या एवढी असणे आवश्यक आहे.

२) निविदा सादर करण्याच्या अंतिम मुदतीपूर्वी मागील तीन वर्षांमध्ये प्रत्येक वर्षी समान वस्तू / यंत्रसामग्री /उपकरणांच्या कमीत कमी एका युनिटचे उत्पादन व विक्री केल्याचा अनुभव असणे आवश्यक .

३) पुरवठादार कोणत्याही सरकारी संस्था, जागतिक बँक समूह किंवा कोणत्याही बाह्य निधी एजन्सीद्वारे निविदा सादर करण्याच्या तारखेला काळ्या यादीत, प्रतिबंधित किंवा निलंबित केलेले नसावे.

४) पुरवठादार वस्तू आणि सेवा कर अंतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक .

५) Conflict of Interest नसणे आवश्यक.

**आ) जर निविदाधारक हा पुरवठादार अथवा वितरक असल्यास :**

१) निविदाधारकास मागील तीन आर्थिक वर्षातील किमान एका वर्षाची आर्थिक उलाढाल अंदाजित खर्चाच्या / **किमतीच्या एवढी असणे** आवश्यक आहे.

२) निविदा सादर करण्याच्या अंतिम मुदतीपूर्वी त्या आर्थिक वर्षात किंवा मागील ३ आर्थिक वर्षामध्ये कमीत कमी एका वर्षामध्ये संपादन करावयाच्या साहित्य / यंत्र सामग्रीच्या किमान समान क्षमतेच्या किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेच्या कमीत कमी एका नगाचा (Unit) यशस्वी रित्या पुरवठा व उभारणी केल्याचा पुर्वानुभव असणे आवश्यक आहे.

३) पुरवठादार संबंधित वस्तूचा/ यंत्रसामुग्रीचा पुरवठा करणारा अधिकृत डीलर किंवा वितरक असणे आवश्यक आहे.

४) पुरवठादार कोणत्याही सरकारी संस्था, जागतिक बँक समूह किंवा कोणत्याही बाह्य निधी एजन्सीद्वारे निविदा सादर करण्याच्या तारखेला काळ्या यादीत, प्रतिबंधित किंवा निलंबित केलेले नसावे.

५) पुरवठादार वस्तू आणि सेवा कर अंतर्गत नोंदणीकृत असावा.

६) Conflict of Interest नसणे आवश्यक.

**टीप:**

कोणत्याही संपादन प्रक्रियेत ठेकेदाराची/पुरवठादाराची निवड करीत असताना त्यामध्ये कोणत्याही प्रकारची सवलत कोणासही देता येणार नाही.

**१०) निविदा शुल्क :**

निविदा प्रक्रियेत साधारण खालील प्रमाणे निविदा शुल्क आकारण्यात यावी.

| अ.क्र. | निविदेची अंदाजित रक्कम | निविदा शुल्क |
|---|---|---|
| १ | रु. ३ लाख ते रु. ५० लाखापर्यंत | रु. ५०० + GST |
| २ | रु. ५० लाखापेक्षा जास्त ते रु. २ कोटी | रु. १००० + GST |
| ३ | रु. २ कोटी पेक्षा जास्त ते रु. ५ कोटी | रु. २००० + GST |
| ४ | रु. ५ कोटी पेक्षा जास्त ते रु. १०० कोटी | रु. ३००० + GST |

टीप: ज्या सी. बी. ओ.ना GST लागू आहे त्यानीच GST ची रक्कम आकारण्यात यावी. म्हणजेच ज्या सी. बी. ओ. यांनी GST अंतर्गत नोंदणी करून GST नंबर मिळाला आहे त्यांनी मूळ निविदा रक्कम अधिक त्यावर १८% GST

लावून एकूण निविदा शुल्क आकारण्यात यावी. ज्या सी.बी.ओ. यांनी GST अंतर्गत नोंदणी केली नसल्यास त्यांनी फक्त मूळ रक्कम निविदा शुल्क म्हणून आकारण्यात यावी.

**११) वस्तू , साहित्य, यंत्र सामुग्री यांचे तांत्रिक तपशील / स्पेसिफिकेशन निश्चिती बाबत :**

अ) सी. बी. ओ. यांना मंजूर करण्यात आलेल्या घटकतील वस्तू, यंत्र समुग्रीचे संपादन करण्यासाठी त्या वस्तू, यंत्र समुग्रीचे स्पेसिफिकेशन हे त्यांचा स्तरावर यांत्रिकी अभियंता किंवा समतुल्य अभियंता मार्फत निश्चित करावे व त्यामध्ये शासकीय मापदंडातील नमूद केलेले सर्व घटक असणे आवश्यक आहे.

उदा. Mini Oil Mill चे संपादन प्रक्रिया करताना निविद मध्ये खालील शासकीय मापदंडात नमूद असलेले घटक असणे आवश्यक आहे.

1. Single chamber oil expeller with reduction gear box
2. Filter press
3. Steam round kettle for cooking seeds
4. Boiler
5. Oil tank
6. Weighing balance
7. Including all electric motors
8. Including all machine accessories
9. Including iron and steel platform

आ) वस्तू, यंत्र समुग्रीचे स्पेसिफिकेशन निश्चित करताना कोणत्याही एका ब्रॅंडचे /मॉडेलचे नाव लिहू नये व तसे लिहणे गरजेचे असल्यासच त्यापुढे "किंवा समतुल्य" असा शब्द लिहावा.

**१२) बांधकामातील Structural design करून घेण्याबाबत:**

सी.बी.ओ. स्तरावर करण्यात येणाऱ्या Warehouse व Shed बांधकामासाठी RCC / PEB साठी Structural design हे काम बांधकामाच्या निविदा प्रक्रियेतून नियुक्त झालेल्या ठेकेदाराने त्याच्या स्व-खर्चाने तयार करून त्यानुसारच बांधकाम पूर्ण करायचे आहे व त्यानुसार सदरची अट निविदा दस्तऐवजात नमूद करण्यात आली आहे. त्यामुळे सी.बी.ओ. यांनी जर Structural design चे काम स्वतंत्र पणे करून घेतल्यास प्रकल्पामार्फत देण्यात येणाऱ्या Operating Expenses च्या अनुदानातून सदरच्या कामासाठीचे देयक देता येणार नाही.

**१३) अग्रिम देण्याबाबत (फक्त यंत्र सामुग्री करिता ):**

सी.बी.ओ. मार्फत यंत्र सामुग्री संपादन प्रक्रियेत निवड झालेल्या पुरवठादारास पुरवठा आदेशाच्या अधिकतम २५% पर्यंतच व तेवढ्याच रकमेची पुरवठादाराने बँक ग्यारंटी दिल्यानंतरच अग्रिम देण्याबाबतची तरतूद निविदादस्तऐवज करण्यात आली आहे. त्यानुसार निविदा प्रसिद्ध करताना निविदा दस्तऐवज मध्ये अग्रिम किती देण्यात येईल याची टक्केवारी स्पष्ट नमूद करण्यात यावी. जर अग्रिम देण्याबाबत निविदा दस्तऐवजात नमूद नसल्यास पुरवठादारास अग्रिम देता येणार नाही.

१४) निविदा दस्तऐवज तयार करण्याबाबत:

सी.बी.ओ. स्तरावरील निविदा दस्तऐवज तयार करण्यास लागत असलेला वेळ विचारात घेता व निविदा प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी रु. ३ लाखावरील सर्व दरपत्रक विनंती पत्र / निविदा दस्तऐवज यांचे प्रारूप तयार करून देण्याची जबाबदारी हि **संबंधित विभागीय संपादन अधिकारी** यांना देण्यात येत आहे . त्या करिता खालील प्रमाणे कार्य पद्धतीचा अवलंब करण्यात यावा.

अ) बांधकामाच्या निविदासाठी लागणारे W2/W5 निविदा दस्तऐवज तयार करण्यासाठी सर्व प्रथम सी.बी.ओ. संपादन समितीने उप-प्रकल्प मंजूरीनुसार बांधकामासाठी तयार करण्यात आलेला Layout Drawing, BOQ इ. विभागीय सहाय्यक अभियंता यांच्या कडून तपासून घेण्यात यावा व त्यामध्ये काही त्रुटी असल्यास त्याची पूर्तता करून घेऊन BOQ अंतिम करावा व त्यानुसार सी.बी.ओ. संपादन समितीने ठराव घेऊन निविदा दस्तऐवज तयार करण्याकरिता व त्यास पूर्व मान्यता मिळण्यासाठी सोबत दिलेल्या सहपत्रा नुसार प्रस्ताव जिल्हा अंमलबजावणी कक्षास सादर करावा. त्यानुसार विभागीय संपादन अधिकारी निविदा दस्त ऐवज तयार करून जिल्हा अंमलबजावणी कक्षाच्या संपादन समितीच्या बैठकीत मान्यतेसाठी ठेवण्यात यावा. जिल्हा अंमलबजावणी कक्षाने निविदा दस्तऐवजास मान्यता दिल्याचे पत्र संबंधित सी.बी.ओ.ला देण्यात यावे. परंतु जर बांधकामाची अंदाजित खर्च रु. १५० लाखापेक्षा जास्त असल्यास सदरचा निविदा दस्तऐवज मंजुरीचा प्रस्ताव शिफारसी सह विभागीय अंमलबजावणी कक्षास सादर करण्यात यावा. विभागीय अंमलबजावणी कक्षाच्या संपादन समितीच्या बैठकीत निविदा दस्तऐवज मान्यतेसाठी ठेवण्यात यावा. विभागीय अंमलबजावणी कक्षाने निविदा दस्तऐवजास मान्यता दिल्याचे पत्र संबंधित सी.बी.ओ.ला देण्यात यावे व त्याची एक प्रत जिल्हा अंमलबजावणी कक्षास देण्यात यावी.

आ) वस्तू/यंत्र सामुग्री इत्यादीच्या निविदासाठी लागणारे E2/E5 निविदा दस्तऐवज तयार करण्यासाठी सर्व प्रथम सी.बी.ओ. संपादन समितीने उप-प्रकल्पातील मंजूर करण्यात आलेल्या घटकतील वस्तू, यंत्र समुग्रीचे संपादन करण्यासाठी त्या वस्तू, यंत्र समुग्रीचे स्पेसिफिकेशन संपादन समितीने निश्चित करावे व त्यानुसार सी.बी.ओ. संपादन समितीने ठराव घेऊन निविदा दस्तऐवज तयार करण्याकरिता व त्यास पूर्व मान्यता मिळण्यासाठी सोबत दिलेल्या सहपत्रा नुसार प्रस्ताव जिल्हा अंमलबजावणी कक्षास सादर करावा. त्यानुसार विभागीय संपादन अधिकारी निविदा दस्त ऐवज तयार करून जिल्हा अंमलबजावणी कक्षाच्या संपादन समितीच्या बैठकीत मान्यतेसाठी ठेवण्यात यावा. जिल्हा अंमलबजावणी कक्षाने निविदा दस्तऐवजास मान्यता दिल्याचे पत्र संबंधित

सी. बी. ओ.ला देण्यात यावे. परंतु जर वस्तू / यंत्र सामुग्री ची अंदाजित खर्च रु. १५० लाखापेक्षा जास्त असल्यास सदरचा निविदा दस्तऐवज मंजुरीचा प्रस्ताव शिफारसी सह विभागीय अंमलबजावणी कक्षास सादर करण्यात यावा. विभागीय अंमलबजावणी कक्षाच्या संपादन समितीच्या बैठकीत निविदा दस्तऐवज मान्यतेसाठी ठेवण्यात यावा. विभागीय अंमलबजावणी कक्षाने निविदा दस्तऐवजास मान्यता दिल्याचे पत्र संबंधित सी.बी.ओ.ला देण्यात यावे व त्याची एक प्रत जिल्हा अंमलबजावणी कक्षास देण्यात यावी.

इ) वरील (अ) / (आ) नुसार निविदा दस्तऐवजास मंजुरी मिळाल्यानंतर सी.बी.ओ. संपादन समितीने निविदा दस्तऐवजातील Tender Notice Tender Notice मधील निविदा प्रसिद्ध करण्याचे वेळा पत्रक अंतिम करून वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात यावी. सदर जाहिरात वर्तमानपत्रात प्रसिद्ध होण्याच्या २ दिवस अगोदर अंतिम निविदा दस्तऐवजाची PDF File प्रकल्पाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धी करिता विभागीय अंमलबजावणी कक्षास पाठविण्यात यावे व त्याची प्रत जिल्हा अंमलबजावणी कक्षास पाठविण्यात यावी. मंजूर करण्यात आलेल्या निविदा दस्तऐवजामध्ये कोणताही बदल सी. बी.ओ. यांना करता येणार नाही व तसे केल्यास सी.बी.ओ.संपादन समिती त्यास जबाबदार राहील. विभागीय संपादन अधिकारी याने प्राप्त निविदा दस्तऐवज प्रकल्पाच्या संकेतस्थळावर विहित मुदतीत प्रसिद्ध करण्यात यावे.

टीप : रु. १० लक्ष पर्यंतच्या संपादन प्रक्रीयेकरिता लागणाऱ्या दर पत्रक विनंती पत्र तयार करून मिळण्यासाठी संबंधित सी.बी.ओ. संपादन समितीने सोबत दिलेल्या सहपत्रा नुसार विभागीय अंमलबजावणी कक्षास सादर करण्यात यावा व त्याची एक प्रत जिल्हा अंमलबजावणी कक्षास देण्यात यावी. विभागीय संपादन अधिकारी दरपत्रक विनंती पत्र तयार करून संबंधित सी.बी.ओ. यांना देण्यात येईल त्याकरिता कोणत्याही पूर्व मान्यतेची आवश्यकता नाही.

**१५) इतर महत्त्वाच्या सूचना :**

१. निविदा प्रक्रियेतील दरपत्रक विनंती पत्र / निविदा दस्तऐवज प्रारूप निश्चित करणे, तांत्रिक दस्तऐवज तपासणी व आर्थिक प्रस्ताव यासाठी बोलाविण्यात आलेल्या सी.बी.ओ. संपादन समितीच्या बैठकीस तांत्रिक सल्लागार जिल्हा अंमलबजावणी कक्षातील पुरवठा व मूल्य साखळी तज्ञ उपस्थित असणे बंधनकारक आहे तसेच त्यांच्या संपादन समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तावर स्वाक्षरी असणे बंधनकारक आहे.

२. निविदा प्रक्रियेमध्ये काही गैर प्रकार झाल्यास सदरची निविदा प्रक्रिया रद्द करण्यात यावी व जाहिरातीसाठी आलेला खर्च उप-प्रकल्पासाठी देण्यात आलेल्या अनुदानातून करता येणार नाही तसेच संबंधित सी. बी. ओ. च्या मंजूर करण्यात आलेला उप प्रकल्प रद्द करण्याबाबतची योग्य कार्यवाही करावी.

३. निविदा प्रक्रियेमध्ये सी.बी.ओ. च्या कोणत्याही प्रतिनिधीने किंवा प्रकल्पाचे अधिकारी /कर्मचारी यांनी निविदाधारकांची निविदा प्रक्रियेबाबत दिशाभूल करणे,जाणूनबूजून खोटी माहिती देणे, अपुरी माहिती देणे, निविदा प्रक्रियेत जाणूनबुजून समावेश करून न घेणे , दस्तऐवज गहाळ करणे , खोटी कागदपत्रे सादर करणे ,संपादन समितीच्या बैठकीस जाणूनबुजून उपस्थित न राहणे, निविदा प्रक्रियेस विलंब करणे , निश्चित केलेली संपादन पद्धतीने संपादन प्रक्रिया न करणे इत्यादी बाबींसाठी काही तक्रारी आल्यास किंवा निदर्शनास आल्यास व त्यामध्ये सत्यता आढल्यास संबंधित सी.बी.ओ.चा मंजूर उप-प्रकल्प रद्द करण्यात यावा तसेच दोषींवर कार्यवाही करण्यात यावी.

४. निविदा सादर करण्याची अंतिम वेळ हि शक्यतो दुपारी १ ते ३ च्या दरम्यान ठेवण्यात यावी जेणेकरून प्राप्त निविदांमधील तांत्रिक दस्तऐवज त्याच दिवशी अंतिम मुदतीनंतर अर्ध्या तासाने उघडून त्यातील तांत्रिक दस्तऐवजाची तपासणी त्याच दिवशी करून तांत्रिक दस्तऐवज तपासणी अहवाल संबंधित जिल्हा अंमलबजावणी कक्षास मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

५. निविदा संदर्भात निविदाधारकांना देण्यात येणारी माहिती,सूचना इत्यादी ह्या सी.बी.ओ.ने त्यांच्या अधिकृत इमेल वरून देण्यात याव्यात व त्याची एक प्रत संबंधित जिल्हा अंमलबजावणी कक्षास व विभागीय अंमलबजावणी कक्षास पाठविण्यात /देण्यात यावी.

टीपः सदरच्या मार्गदर्शक सूचनेत/ पुस्तकात **निविदा** किंवा **निविदा प्रक्रियेत** या शब्दांचा अर्थ संपादन प्रक्रियेतील दरपत्रक विनंती पत्रा द्वारे किंवा निविदा दस्तऐवजा द्वारे करण्यात येणाऱ्या संपादन पद्धतीत एकच असा समजण्यात यावा.

**प्रकल्प संचालक**
**स्मार्ट, प्रकल्प**

# समुदाय आधारीत संस्थेचे (CBO) लेटरहेडवर

जा.क्र. ..................................................... दिनांक :- / /२०२३

प्रति,
प्रमुख, जिल्हा अंमलबजावणी कक्ष
स्मार्ट प्रकल्प, जिल्हा XXX

विषय :- स्मार्त प्रकल्पांतर्गत मंजूर उपप्रकल्पातील खालील घटकांकरिता संपादन राबवणेकरिता पूर्वमान्यतेसह निविदा दस्त ऐवज तयार करून मिळणेबाबत.

महोदय,

जागतिक बँक अर्थसहाय्यीत स्मार्ट प्रकल्पाअंतर्गत .......................समुदाय आधारीत संस्थेच्या ........................................................या उपप्रकल्पासाठी खालील घटकांचे संपादन प्रक्रिया राबवण्याचे आहे. त्याकरिता, पूर्वमान्यतेसह निविदा दस्त ऐवज तयार करून मिळावेत हि विनंती.
त्याकरिता आवश्यक माहिती खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

**बांधकाम विषयक**

| अ.क्र. | तपशील | शेरा |
|---|---|---|
| १ | बांधकामाचे वर्णन | |
| २ | उपप्रकल्प मंजुरी आदेश | सहपत्रीत |
| ३ | अंदाजपत्रक | Soft Copy सह सोबत जोडले आहे |
| ४ | Layout / Drawings | Soft Copy सह सोबत जोडले आहे |
| ५ | Bill of Quantity | Soft Copy सह सोबत जोडले आहे |
| ६ | Work Completion Period | .. .......(In Months) |
| ७ | GST लागू आहे का ? असल्यास GST नंबर | होय / नाही |
| ८ | संपादन समिती ठराव | सहपत्रीत |
| ९ | सी. बी. ओ. चा संपूर्ण पत्ता व संपर्क क्रमांक | |
| १० | सी.बी.ओ.च्या बँक अकाऊंट माहिती | 1. CBO Account Name:<br>2. Bank Account No:<br>3. Bank Account Type:<br>4. Bank Name:<br>5. Bank Branch:<br>6. IFSC Code: |
| ११ | निविदा कालावधी | ..........दिवस |

वस्तू/ यंत्र सामुग्री विषयक

| अ.क्र. | तपशील | शेरा |
|---|---|---|
| १ | घटकाचे नाव | Soft Copy सह सोबत जोडले आहे |
| २ | उपप्रकल्प मंजुरी आदेश | सहपत्रीत |
| ३ | वस्तुचे / यंत्र सामुग्रीचे विस्तृत तांत्रिक स्पेसिफिकेशन | Soft Copy सह सोबत जोडले आहे |
| ४ | संख्या / नग आणि एकक (युनिट) | Soft Copy सह सोबत जोडले आहे |
| ५ | वस्तुचे / यंत्र सामुग्री पुरवठा व उभारणी करण्यासाठी काल मर्यादा | .. .............दिवस |
| ६ | वस्तुचे / यंत्र सामुग्री पुरवठा व उभारणी करण्याचे ठिकाण | |
| ७ | अग्रिम प्रस्तावित (Advance) ----- % | ........% |
| ८ | देयक अदायगी तरतूद | 1. वस्तुचे / यंत्र सामुग्री पुरवठा झाल्यावर ---- %<br>2. वस्तुचे / यंत्र सामुग्री यशस्वीरीत्या उभारणी केल्यावर --- %<br>3. उभारणीनंतर सर्व चाचण्या / तपासणी / प्रमाणीकरणानंतर ---- % |
| ९ | GST लागू आहे का? असल्यास GST नंबर | होय / नाही |
| १० | संपादन समिती ठराव | सहपत्रीत |
| ११ | सी. बी. ओ. चा संपूर्ण पत्ता व संपर्क क्रमांक | |
| १२ | सी.बी.ओ.च्या बँक अकाऊंट माहिती | 1. CBO Account Name:<br>2. Bank Account No:<br>3. Bank Account Type:<br>4. Bank Name:<br>5. Bank Branch:<br>6. IFSC Code : |
| १३ | निविदा कालावधी | ............दिवस |

तरी, वरील माहितीनुसार पूर्व मान्यतेसह निविदा दस्त ऐवज तयार करून मिळावेत हि विनंती.

सोबत : उपरोक्त तत्त्यानुसार आवश्यक तपशील

**समुदाय आधारित संस्थेचे नाव व शिक्का**

(स्वाक्षरी) अध्यक्ष संपादन समिती

(स्वाक्षरी) – पुरवठा मूल्य साखळी तज्ञ